| MHPU120002882020 | नियमित दिवाणी दावा क्र.४६/२०२० |
|---|---|
| | निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश |
| | ( श्रीमती सुभद्राबाई तरस व इतर विरूद्ध अमर किरण भालघरे व इतर ) |

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ ते ८ व प्रतिवादी क्र.१७ ते २० यांनी दावा मिळकतीची विक्री करुन त्रयस्थ पक्षकारांचे हक्क व हितसंबंध निर्माण करु नये अशा तुर्तातुर्त मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे.

**०२. दावा मिळकतीचे वर्णन :-**

तुकडी-पुणे, पोट तुकडी- भोर, दुय्यम सहायक निबंधक भोर, मौजे केंजळ येथील शेतजमीन

| अ.क्र. | गट नंबर | हे. आर | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | ७५३ | ०१.२४ | ०१.२४ |
| २ | ७ | ००.४२ | ००.४२ |
| ३. | १८१ | ००.९३ | ००.९३ |

यांच्या चतुःसिमा पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | गट नंबर | पुर्व गट नंबर | पश्चिम गट नंबर | दक्षिण गट नंबर | उत्तर गट नंबर |
|---|---|---|---|---|---|
| अ | ७५३ | रस्ता | ७५२ | ७५४,७५५ | ७५७,७७७ |
| ब | ७ | - | - | - | - |
| क | १८१ | - | - | - | - |

**(येणेप्रमाणे उपरोक्त वाद मिळकतीस यापुढे सोईकरीता "दावा मिळकत" असे संबोधण्यात येईल )**

**०३.** वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही कोंडीबा भालघरे यांच्या मालकीची मिळकत आहे. वादी क्र.१ ही कोंडीबा भालघरे यांची मुलगी असून वादी क्र.२ व ३ हे कोंडीबा भालघरे यांची मयत मुलगी लिला राऊत यांची मुले आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ५ हे

कोंडीबा भालघरे यांचा मुलगा बाळकृष्ण भालघरे यांचे वारसदार आहेत. प्रतिवादी क्र.६ ते ८ हे कोंडीबा भालघरे यांचा मुलगा बळीराम भालघरे यांचे वारसदार आहेत. प्रतिवादी क्र.९ ते १३ हे कोंडीबा भालघरे यांची मयत मुलगी सुमन साळुंखे यांचे वारसदार आहेत. तसेच प्रतिवादी क्र.१४ ते १६ हे कोंडीबा भालघरे यांची मयत मुलगी निर्मला ओंबळे यांचे वारसदार आहेत. प्रतिवादी क्र.१७ ते २० हे दावा मिळकत गट क्र.७५३ चे खरेदीदार आहेत.

**०४.** वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ ते १६ यांची वडीलोपार्जित मालकी व ताबे वहिवाटीची मिळकत आहे. त्याचप्रमाणे दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर वादी व प्रतिवादी यांची नोंद वारस हक्काने झालेली आहे. दावा मिळकतीचे मुळ मालक कोंडिबा बालबा उर्फ बाल्हु भालघरे हे दि.२२.०४.१९८१ रोजी मयत झालेले आहेत. त्यांच्या मृत्युनंतर फेरफार क्र.३५९ अन्वये त्यांच्या वारसदारांची नोंद सन १९८६ मध्ये झालेली आहे. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीचे अद्याप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. त्यामुळे वादी क्र.१ यांचा दावा मिळकतीमध्ये १/६ व वादी क्र.२ व ३ यांचा १/६ इतका हिस्सा आहे.

**०५.** वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीपैकी गट क्र.७५३ ही वादी व प्रतिवादी यांची वडिलार्जित मिळकत असताना देखील वादी यांचे हक्क डावलण्याकरीता प्रतिवादी क्र.१ व ६ यांनी प्रतिवादी क्र.२ ते ५ व ७ ते ८ यांना हाताशी धरुन दि.२७.१०.२०१७ रोजी प्रतिवादी क्र.१७ ते २० यांना नोंदणीकृत खरेदीपत्र क्र.३४४१/२०१७ अन्वये विकलेली आहे. त्याप्रमाणे फेरफार क्र. ३१५० नोंदविण्यात आलेला आहे. सदरचा फेरफार रद्द करण्याकरीता वादी यांनी उपविभागीय अधिकारी भोर यांच्याकडे अपील देखील दाखल केलेले आहे. वादीच्या कथनाप्रमाणे सदर खरेदी पत्रास वादी व प्रतिवादी क्र.९ ते १६ यांची संमती घेतलेली नाही. त्याचप्रमाणे सदरचे खरेदीपत्र

हे कोणत्याही कौटुंबिक खर्चासाठी अथवा उपजिविकेसाठी केलेले नाही. सबब, सदरचे खरेदीखत हे वादी यांच्या हिश्यावर बंधनकारक नाही.

**०६.** वादीच्या कथनाप्रमाणे वादी यांनी प्रतिवादी यांच्याकडे उपरोक्त खरेदीखताबाबत विचारणा करुन दावा मिळकतीचे वाटप करुन मागितले होते. परंतु प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. तसेच वाटप करुन देण्यास नकार दिला. त्यानंतर वादी व प्रतिवादी क्र.९ ते १६ यांनी दि.०६.११.२०१९ रोजी कायदेशीर नोटीस पाठवून खरेदीखताचा दस्त रद्द करुन, वाटप करुन देण्याची मागणी केली. सदर नोटीस प्राप्त होवून देखील प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी कोणतेही उत्तर दिलेले नाही अथवा त्याची पुर्तता केलेली नाही. सबब, वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

**०७.** वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ८ व १७ ते २० हे दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत. सबब, महसूल नोंदीच्या आधारे त्यांनी विक्री केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. वादी यांस प्रथमदर्शनी दावा शाबित केलेला आहे. तसेच न्यायाचा तराजू देखील त्यांच्या बाजूने आहे. त्यामुळे प्रतिवादींविरुध्द मनाई देणे आवश्यक आहे. सबब, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०८.** प्रतिवादी क्र.१ ते ३, ६ व ७ यांनी नि.१७ वर त्यांची कैफियत दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. तसेच नि.१९ वर त्यांचे म्हणणे देखील दाखल केलेले आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे सदरचा दावा हा कायद्याप्रमाणे चालण्यास पात्र नाही. त्यांनी दाव्यातील कथने स्पष्टपणे नाकारली आहेत. तसेच त्यांच्या कथनाप्रमाणे आवश्यक पक्षकारांना सामील न केल्यामुळे व दावा मुदतीत दाखल न केल्यामुळे दावा रद्द होण्यास पात्र आहे. त्याचप्रमाणे दाव्याची आकारणी योग्य केलेली नसून त्यावर आवश्यक ते

न्यायालयीन शुल्क देखील दिलेले नाही त्या कारणास्तव देखील दावा रद्द होण्यास पात्र आहे. त्याचप्रमाणे वादी यांनी दावा मिळकतीचे वर्णन अपूर्ण केलेले असून मिळकत क्र. ब व क यांच्या चतुःसिमा देखील दिलेल्या नाहीत.

**०९.** प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीचे वाटप हे आधीच झाले असून त्यानुसार आणेवारी होवून फेरफार देखील मंजूर झालेला आहे. वादी व प्रतिवादी क्र.९ ते १६ यांची नोंद ही पोकळीस्त असून त्यांना दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क व हिस्सा प्राप्त होत नाही. याउलट त्यांनी दावा मिळकतीचे मुळ मालक कोंडीबा भालघरे असल्याबाबत व त्यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या वारसांची नोंद सन १९८६ साली झाल्याची बाब मान्य केलेली आहे. परंतु त्यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीचे यापूर्वी वाटप झालेले असून त्याप्रमाणे मालकी सदरी प्रतिवादी क्र.१ ते ८ यांची नावे वारसहक्काने लागलेली आहेत.

**१०.** प्रतिवादींच्या कथनांप्रमाणे फेरफार क्र.८२९ अन्वये बाळकृष्ण कोंडीबा भालघरे यांच्या लेखी अर्जावरुन बाळकृष्ण व बळीराम यांची नावे प्रत्येकी आठ आणे हिश्यास लागलेली आहेत. सदर फेरफाराबाबत सर्व हितसंबंधांना सुचना दिल्याबाबत देखील नमूद आहे. सबब, सदर फेरफेराबाबत वादी क्र.१, वादी क्र.२ व ३ व प्रतिवादी क्र.९ ते १६ यांच्या पूर्वजांना सर्व कल्पना होती. परंतु सदर फेरफारास त्यांनी आज पर्यंत आव्हानित केलेले नाही. सबब, सदर फेरफाराप्रमाणे झालेले वाटप हे योग्य व कायदेशीर होते व त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ८ यांच्याकडे दावा मिळकतीची मालकी व ताबे वहिवाट होती. त्याप्रमाणे गट क्र.७५३ ची विक्री ही प्रतिवादी क्र.१७ ते २० यांना केलेली आहे.

**११.** प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे कोंडीबा भालघरे यांच्या मृत्युनंतर त्यांची मुले बाळकृष्ण व बळीराम यांना दावा मिळकती या वारसहक्काने आलेल्या आहेत व त्यानंतर त्यांच्या वारसांना सदर दावा मिळकती या वारसहक्काने प्राप्त झालेल्या आहेत. वादी क्र.१, वादी क्र.२ व ३ व प्रतिवादी क्र.९ ते १६ यांच्या पूर्वजांना बाळकृष्ण व बळीराम यांच्या मध्ये झालेले वाटप हे मान्य असल्याने त्यांनी कधीही कायदेशीर वाटपास हरकत घेतलेली नाही. परंतु सद्यपरिस्थितीत जमीनीचे भाव गगनाला भिडलेले असताना पोकळीस्त नोंदीच्या आधारे वादी व प्रतिवादी क्र.९ ते १६ हे बेकायदेशीर वाटप मागत आहेत. त्यांच्या कथनाप्रमाणे वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नाहीत. सबब, त्यांनी दावा व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**१२.** प्रतिवादी क्र.४, ५ व ८ यांना समन्स मिळून देखील त्यांनी हजर होवून त्यांची कैफियत दाखल केली नसल्यामुळे दि.०१.०३.२०२५ व १९.०४.२०२४ रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत दावा त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात येत आहे.

**१३.** प्रतिवादी क्र. १७ ते २० यांनी नि.६५ वर त्यांचे संयुक्त म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारलेला आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे वादींनी खरेदीखत रद्द करुन मागितलेले आहे. परंतु खरेदी किमतीवर आकारणी केलेली नाही. त्यामुळे त्या कारणास्तव देखील अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीचे सन १९९२ मध्ये वाटप झालेले आहे. परंतु वादीने सदर वस्तुस्थिती न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे. त्यामुळे वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेला नाही. त्याचप्रामणे वादी व प्रतिवादी क्र. १ ते १६ यांचे पूर्वधिकारी कोंडीबा भालघरे हे सन १९९५ पूर्वीच मयत झाल्यामुळे त्यांच्या मुलीला प्रस्तुत मिळकतीत हक्क असण्याचे कोणतेही कारण नाही.

**१४.** प्रतिवादींच्या कथनांप्रमाणे कोंडीबा बाल्हु भालघरे हे दि.२२.०४.१९८१ रोजी मयत झालेले आहेत. त्यांच्या मृत्युपश्चात बाळकृष्ण, बळीराम ही मुले, सुमन, सुभद्राबाई, निर्मला व लिला अशा चार मुली आहेत. त्याप्रमाणे त्यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.३५९ अन्वये ७/१२ सदरी झालेली आहे. त्यानंतर सन १९९२ मध्ये फेरफार क्र.८२९ अन्वये दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी आणेवारीची नोंद करण्यात आली. त्याप्रमाणे प्रत्येक जण सदर वाटपानुसार स्वतंत्रपणे वहिवाट करीत होते. सदर फेरफारास वादीने आजतागायत आव्हानित केलेले नाही. याउलट सदर फेरफार वादीने या न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यामुळे पूर्वी वाटप झाले असल्यामुळे पुन्हा वादीस वाटप करुन मागता येणार नाही.

**१५.** प्रतिवादी क्र.१ ते ८ यांना कौटुंबिक, कायदेशीर व आर्थिक अडचण असल्यामुळे गट क्र.७५३ ही विक्रीस काढलेली होती. त्यावेळी प्रस्तुत प्रतिवादी यांचे शेत सदर जमीनीस लागून असल्यामुळे त्यांना देखील सदर शेतजमीन आवश्यक होती. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ व १७ ते २० यांच्यामध्ये झालेल्या बोलणीनंतर प्रतिवादी क्र.१७ ते २० यांनी सदर गट नंबरची प्रत्यक्ष पाहणी करुन व त्याबाबत कायदेशीर शोध घेवून मिळकत निर्वेध असल्याची खात्री केली. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ व इतर यांनी दिलेल्या माहितीवर विश्वास ठेवून दावा मिळकत रक्कम रुपये १,५०,००,०००/– मोबदल्यापोटी खरेदी केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी हे प्रामाणिक खरेदीदार आहेत. तसेच दावा मिळकतीसंदर्भात इतर वारसांनी हरकत निर्माण केल्यास त्याचे निराकरण करण्याची संपूर्ण जबाबदारी प्रतिवादी क्र.१ ते ८ यांच्यावर होती व आहे. सबब, दाव्याचे संपूर्ण निराकरण करण्याची जबाबदारी देखील प्रतिवादी क्र.१ ते ८ यांच्यावर आहे. सबब, त्यांनी दावा रद्द करण्याची विनंती केलेली आहे. याउलट वाटपाचा हुकुम केल्यास प्रस्तुत गट नंबर ७५३ हा प्रतिवादी क्र.१ ते ८ यांना मिळण्याचा हुकुम करण्याबाबत विनंती केलेली आहे.

**१६.** त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१४ व १५ यांनी देखील त्यांची कैफियत प्रस्तुतकामी दाखल केलेली आहे. परंतु त्यांच्याविरुध्द प्रस्तुत अर्जामध्ये कोणतीही मागणी नसल्यामुळे त्यांची कैफियत प्रस्तुत अर्जाच्या निर्गतेवेळी विचारात घेण्यात येत नाही.

**१७.** अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे आणि वादीच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद यावरुन पुढील मुद्दे माझे विचारार्थ उद्भवतात. त्यावर मी कारणांसहित उत्तरे यापुढे नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे प्रथमदर्शनी केस त्यांच्या लाभात असल्याचे सिध्द करतात काय ? | **होकारार्थी** |
| २. | तुर्तातूर्त मनाई न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे असे वादी सिध्द करतात काय ? | **होकारार्थी** |
| ३. | सोयीस्करतेचा तुला वादी यांच्या बाजुने आहे असे ते सिध्द करतात काय ? | **होकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | **अर्ज मंजुर करण्यात येतो.** |

**१८.** वादीच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या कथनाशी सुसंगत असा युक्तीवाद केलेला आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी दावा मिळकत ही एकत्र कुटुंबाची मिळकत असल्याचे मान्य केलेले आहे. त्याचप्रमाणे वादी यांच्याशी असलेले नातेसंबंध देखील मान्य केलेले आहे. अशा परिस्थितीत वादी यांचा दावा मिळकतीत हक्क व अधिकार असल्याची बाब देखील प्रतिवादी यांनी मान्य केलेली आहे. याउपर वादीचे नाव फेरफार क्र.३५६ अन्वये नोंद झाल्याची बाब देखील प्रतिवादी यांनी मान्य केलेली आहे. सबब, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादीने सकृतदर्शनी केस शाबित

केलेली आहे. त्यामुळे सोईचा समतोल देखील वादीच्या बाजूने आहे. अशा परिस्थितीत मनाई अर्ज नामंजूर केल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. त्यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या पुष्टयर्थ ***मा. उच्च न्यायालयाच्या शिवपालसिंग गौर व इतर वि. गणेश बिसन (२०२२ (१)ऑल एम आर ३३६)*** व ***मा. मध्यप्रदेश उच्च न्यायालयाच्या कैलाश चंद्र वि. पद्मसिंग (ए आय आर २०१६ मध्यप्रदेश ३०)*** या न्यायनिर्णयांवर त्यांची भिस्त ठेवलेली आहे.

**१९.** प्रतिवादी क्र.१ ते ३, ६ व ८ तर्फे विद्वान विधीज्ञांनी देखील त्यांच्या कैफियतीच्या अनुषंगाने युक्तिवाद केलेला आहे. युक्तीवादादरम्यान त्यांनी त्यांची भिस्त फेरफार क्र.८२९ वर ठेवलेली आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे उपरोक्त फेरफार अन्वये सन १९९२ मध्ये मयत बाळकृष्ण व बळीराम यांच्यामध्ये वाटप झालेले आहे. तसेच सदर फेरफाराबाबत सर्व हितसंबंधांना म्हणजेच प्रस्तुत वादी यांनादेखील संबंधित वेळेस नोटीस देण्यात आलेली होती. त्याप्रमाणे सदरचा फेरफार देखील मंजूर झालेला आहे. तसेच वादींनी सदरचा फेरफार आजतागायत कोणत्याही न्यायालयात आव्हानित केलेला नाही. सबब, सदरचा फेरफार हा कायम झालेला आहे. याउलट वादींच्या नावाची केवळ पोकळीस्त नोंद ७/१२ उताऱ्यावर असल्याचा फायदा घेवून वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत अर्ज निर्गमित करण्याकरीता कोणतीही तातडीची निकड वादी यांनी विशद केलेली नाही. याउलट, वादी प्रस्तुत अर्ज चालवित नसल्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांनी नि.६९ वर पुरसिस दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज हा मुळ दाव्यासोबत चालविण्याची विनंती केलेली होती. शेवटी त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**२०.** प्रतिवादी क्र.१७ ते २० यांच्यातर्फे देखील विद्वान विधीज्ञांनी युक्तीवाद करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्यांनी देखील त्यांच्या कैफियतीप्रमाणे युक्तिवाद केलेला आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे महसूल दप्तरी असलेल्या नोंदी प्रमाणे सन १९९२ मध्येच दावा मिळकतीचे वाटपपत्र झालेले होते. त्यानुसार प्रतिवादी क्र.१ ते ८ हे दावा मिळकतीच्या ताबे वहिवाटीत होते व आहेत. त्यानंतर प्रस्तुत प्रतिवादी यांनी सर्व बांबीची खातरजमा करुन दावा मिळकत खरेदी घेतलेली आहे. सबब, ते प्रामाणिक खरेदीदार असून त्यासाठीचा आवश्यक तो मोबदला त्यांनी दिलेला आहे. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

## –का र ण मि मां सा –

**२१.** प्रस्तुतचा अर्ज हा तुर्तातूर्त मनाई हुकूमाकरीता आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज निकाली करताना खालील गोष्टींची पडताळणी करणे आवश्यक आहे.

**अ.** सकृतदर्शनी केस.

**ब.** अपरिमित नुकसान.

**क.** सोयीचा समतोल.

**ड.** पक्षकारांचे वर्तन (Conduct of the parties)

**मुद्दा क्रमांक १ करीता :–**

**२२.** मुद्दा क्रमांक १ हा सकृतदर्शनी केस यासंबंधी आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये सकृतदर्शनी केस याबाबत व्याख्या दिलेली नाही. परंतु, मा.सर्वोच्च न्यायालय व मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी विविध न्यायनिवाडयांमध्ये सकृतदर्शनी केस निश्चित केलेली आहे. सकृतदर्शनी केस म्हणजे जर एखादया गोष्टीचे पुरावे दिले गेल्यास ती गोष्ट शाबीत होईल. थोडक्यात सकृतदर्शनी केस म्हणजे वादीच्या यशाची शाश्वती. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकत ही एकत्र कुटुंबाची मिळकत असून त्यामध्ये वादीचा २/६ इतका हिस्सा आहे. परंतु प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी वादीचा

हिस्सा डावलून परस्पर दावा मिळकतीबाबत त्रयस्थ पक्षकारांशी व्यवहार केलेले आहेत. सबब, दावा मिळकतीचे सरसनिरसमानाने वाटप करुन मिळण्याकरीता, हक्कज्ञापनाकरीता व त्या अनुषंगाने मनाईकरीता प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे. याउलट, प्रतिवादींच्या कैफियतीप्रमाणे दावा मिळकतीचे यापूर्वीच वाटप झालेले असून प्रस्तुत वादी यांचा दावा मिळकतीत कोणताही हक्क व हितसंबंध नाही. परंतु पोकळीस्त महसूल नोंदीच्या आधारे वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

**२३.** प्रस्तुत दाव्यामध्ये वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकती या एकत्र कुटुंबाच्या मिळकती आहेत. सबब, वादीने सकृतदर्शनी दावा मिळकती या एकत्र कुटुंबाच्या आहेत ही बाब शाबित करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वादीने नि.३ सोबत दावा मिळकतीचे ७/१२ उतारे दाखल केलेले आहेत. सदर ७ /१२ उताऱ्यामध्ये इतर अधिकार रकान्यामध्ये वारस म्हणून प्रस्तुत वादी क्र.१ व वादी क्र.२ व ३ यांच्या पुर्वहक्कदार लिला अरुण राऊत यांचे नाव दिसून येते. त्याचप्रमाणे फेरफार क्र.३५९ चे अवलोकन करता सन १९८६ मध्ये कोंडीबा बाल्हु भालघरे यांच्या मृत्युनंतर वादी क्र.१ व वादी क्र.२ व ३ यांच्या पूर्वहक्कदारांची नावे व त्यांच्या इतर वारसांची नावे ही दावा मिळकतीच्या महसूल अभिलेखी नोंदविल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे वारस नोंद झाल्याचे देखील दिसून येते. सदर बाबतीत हे नमूद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी यांनी देखील त्यांच्या कैफियतीमध्ये सदर फेरफार क्र.३५९ हा मान्य केलेला आहे. तसेच दावा मिळकतीचे मुळ मालक कोंडीबा भालघरे असल्याचे देखील मान्य केलेले आहे. अशा परिस्थीतीत वादी क्र.१ ही मयत कोंडीबा भालघरे यांची मुलगी असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे वादी क्र.२ व ३ हे कोंडीबा भालघरे यांची मयत मुलगी लिला राऊत यांचे वारस असल्याचे दिसून येते. कैफियतीचे अवलोकन करता नातेसंबंधाबाबत गंभीर असा प्रश्न निर्माण झालेला नाही. याउलट नातेसबंध मान्य असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

२४. वादींनी दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यांचे अवलोकन करता दावा मिळकत ही मुळ कोंडीबा भालघरे यांच्या मालकीची असल्याचे दिसून येते. सबब, हिंदू वारस कायद्याप्रमाणे त्यांच्या मृत्युनंतर दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नसल्यास सद्यपरिस्थीतीत स्थापित कायद्यानुसार वादीला देखील वाटप करुन घेण्याचा अधिकार आहे. प्रस्तुत प्रकरणात वाद मिळकत ही एकत्रीत कुटुंबाची असल्याचे दिसून येते. परंतु प्रतिवादींच्या कैफियतीप्रमाणे दावा मिळकतीचे यापूर्वीच सरसनिरस मानाने वाटप झालेले आहे. सदर बाब सकृतदर्शनी शाबित करण्याकरीता प्रतिवादी यांनी फेरफार क्र.८२९ वर विशेष लक्ष केंद्रीत केलेले आहे. सदर फेरफाराचे अवलोकन करता दि.१९.०४.१९९२ रोजी मयत बाळकृष्ण भालघरे यांच्या माहितीनुसार बाळकृष्ण भालघरे व बळीराम भालघरे यांची नावे प्रत्येकी आठ आणे क्षेत्रास लावल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे फेरफार दि.११.०७.१९९२ रोजी मंजूर झाल्याचे देखील दिसून येते.

२५. वादींनी फेरफार क्र.८२९ हा आव्हानित केल्याबाबत सकृतदर्शनी कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. कायद्यातील स्थापित सिद्धांतानुसार महसूल अभिलेख हे मालकीचे दस्ताऐवज नाहीत. परंतु सदर पुर्वापार महसूल अभिलेखापासून पक्षकारांचा ताबा अथवा सद्यस्थिती लक्षात घेता येवू शकते. फेरफार क्र.८२९ चे अवलोकन करता त्या अन्वये केवळ आणेवारी झाल्याचे दिसून येते. कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार केवळ आणेवारीने वाटप झाले आहे असा निष्कर्ष सद्यस्थितीत काढणे योग्य होणार नाही. याउलट कायद्याप्रमाणे पक्षकारांमध्ये सरस निरस मानाने वाटप झाले आहे किंवा कसे हे पाहणे अत्यावश्यक आहे. सद्यस्थिती फेरफार क्र.८२९ व्यतिरिक्त सरस निरस मानाने वाटप झाले हे दाखविण्याकरीता इतर कोणतेही कागदपत्र नाही. याउलट दावा मिळकत ही एकत्रीत कुटुंबाची असल्याची बाब सकृतदर्शनी दिसून येते. सदर वस्तुस्थितीचा विचार करता दावा मिळकत ही अद्याप सरसनिरस मानाने वाटप

होण्यास पात्र आहे किंवा कसे अथवा तिचे सरसनिरस मानाने वाटप झालेले आहे किंवा कसे ही बाब पुराव्यांतीच निश्चीत होणार आहे. त्याचप्रमाणे वादी यांचा दावा मिळकतीत हिस्सा आहे किंवा कसे याबाबतीत देखील खटल्यांतीच निर्णय होणार आहे. त्यासाठी दोन्ही पक्षकारांना त्यांच्या पुराव्याचे नेतृत्व करण्याची संधी देणे आवश्यक आहे. सदर चर्चेचे एकत्रीतरित्या विवेचन करता सकृतदर्शनी दावा मिळकत ही एकत्रीत कुटुंबाची असल्याचे दिसून येते. परंतु आधी म्हटल्याप्रमाणे वादीचा अधिकार हा दाव्यांतीच साक्षीपुराव्याच्या आधारे निश्चित होणार आहे. त्यामुळे वादीस सकृतदर्शनी केस असल्याचे दिसून येते. त्यामुळे, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ व ३ करीता :–**

**२६.** मुद्दा क्रमांक २ हा अपरिमित नुकसान व मुद्दा क्रमांक ३ हा सोयीचा समतोल याच्याशी निगडीत असल्यामुळे सदरचे दोन्ही मुद्दे हे एकमेकांशी संलग्न आहेत. सबब, पुराव्याची पुनरावृत्ती टाळणेकरीता मी उपरोक्त दोन्ही मुद्दे एकत्रीत चर्चित आहेत.

**२७.** कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार वादीने केवळ सकृतदर्शनी केस शाबीत करणे पुरेसे नाही. त्याचबरोबर त्यांनी तुर्तातूर्त मनाई न दिल्यास त्यांना अपरिमित असे नुकसान होवू शकते तसेच न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजूने आहे हे शाबीत करणे आवश्यक आहे.

**२८.** वादीने प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी यांना त्रयस्थ पक्षकाराचे हितसंबंध निर्माण करण्यापासून प्रतिबंधीत करण्याची विनंती केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३, ६ व ७ यांच्या कैफियतीचे अवलोकन करता त्यांनी वादींचा हिस्साच नाकारलेला आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१७ ते २० यांनी ते प्रामाणिक खरेदीदार असल्याबाबत कथन केलेले आहे. यापूर्वी म्हटल्याप्रमाणे वादीचा दावा मिळकतीमध्ये हिस्सा आहे किंवा कसे अथवा वादी दावा मिळकतीचे वाटप करुन घेण्यास वादी पात्र आहे किंवा कसे ही बाब

पुराव्यांती निश्चित होणार आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ पक्षकारांचे हक्क, हितसंबंध अथवा अधिकार निर्माण केल्यास दाव्यामध्ये क्लिष्टता निर्माण होवून अनेकाविधी होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा उद्देश हा दावा मिळकतीचे अंतिम निकालापर्यंत जतन करणे असा आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील तथ्य विचारात घेता प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण केल्यास खटल्यामध्ये गुंतागुंत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे दावा मिळकतीचे स्वरुप जतन करण्याकरीता प्रतिवादी यांच्याविरुध्द मनाई आदेश देणे न्यायोचित होईल. तसेच सदर आदेश न दिल्यास वादी यांचे हक्क व अधिकार डावलण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सोईचा समतोल हा देखील वादीच्या बाजूने आहे. तसेच *शिवपालसिंग* (सुप्रा) मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने वादीने सकृतदर्शनी वाटपाचा अधिकार दाखविल्यास तसेच दावा मिळकत विक्री होण्याची भिती असल्यास मनाई आदेश देणे उचित असल्याचे म्हटलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी वादी यांचा हक्क पुर्णपणे नाकारला आहे. अशा परिस्थितीत त्यांनी दावा मिळकत विक्री केल्यास वादी यांच्या हक्कावर गदा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे वादी यांनी सकृतदर्शनी केस देखील दाखविलेली आहे. त्यामुळे उपरोक्त प्रकरणात सांगितल्याप्रमाणे मनाई आदेश देणे न्यायोचित आहे. तसेच *कैलाशचंद्र* (सुप्रा) मध्ये मा. मध्यप्रदेश उच्च न्यायालयासमोर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १२ नियम ६ प्रमाणेचा प्रश्न होता. सबब, सदर प्रकरणात दिलेला न्यायनिर्णय प्रस्तुत प्रकरणात सद्यस्थितीत लागू पडत नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१७ ते २० हे प्रामाणिक खरेदीदार आहेत किंवा कसे ही बाब देखील साक्षीपुराव्यांच्या नंतरच ठरणार आहे. सबब, सद्यस्थीतीत प्रतिवादी यांना कोणतीही तोषिस लागत नाही. उपरोक्त चर्चेचा विचार करता मी मुद्दा क्रमांक २ व ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ४ करीता –**

**२९ .** मुद्दा क्रमांक १ ते ३ चे विवेचनावरुन वादीस प्रथमदर्शनी केस आहे, तसेच सोयीचा समतोल व अपरिमित नुकसान वादीचे होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्रमांक ४ च्या निष्कर्षाकरीता मी, पुढील आदेश पारीत करतो.

**– आ दे श –**

**१.** प्रस्तुत अर्ज (निशाणी ५) मंजूर करण्यात येत आहे.

**२.** प्रतिवादी क्र.१ ते ८, प्रतिवादी क्र.१७ ते २० यांना अथवा त्यांच्यातर्फे हक्क सांगणाऱ्या इतर कोणत्याही इसमांना अनुक्रमे दावा मिळकत गट क्र.७ व १८१, व दावा मिळकत गट क्र. ७५३ मध्ये दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत त्रयस्थ पक्षकारांचे कोणत्याही प्रकारचे हितसंबंध निर्माण करण्यापासून तुर्तातुर्त मनाई हुकुमाद्वारे प्रतिबंधीत करण्यात येते.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2025.10.09 15:05:07 +0530

**ठिकाणः– भोर .** **( एस.डी.शिरसाट )**
**दिनांकः– ०८.१०.२०२५.** **२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**भोर.**

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | |
|---|---|
| Name of the Steno | Shri. A.D.More |
| Court Name | Hon'ble S.D. Shirsat<br>2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C.,Bhor, Pune |
| Date of Order/Judgment | 08/10/2025 |
| Date of Sign Order/Judgment | 09/10/2025 |
| Order uploaded on | 09/10/2025 |